# व्यक्तिस्वातंत्र्याचे बदलते न्यायालयीन अर्थ

**विश्वंभर धर्मा गायकवाड.** एम.ए., पीएच.डी., एल.एल.एम. सहयोगी प्राध्यापक शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर
मो.9423343473 Email id:vishwambar10@gmail.com

गेल्या सत्तरच्या दशकापासून ते आजपर्यंत भारतीय सर्वोच्च न्यायालय न्यायालयीन सक्रियतेच्या दिशेने अनेक महत्त्वपूर्ण निवाडे देत आलेले आहे. ज्याचा परिणाम भारतीय राजकारण, समाजकारण व अर्थकारण यावर मोठ्या प्रमाणात सुधारणात्मक बदल दिसत आहेत. ज्यामुळे संविधान कर्त्याचा मूळ उद्देश जो संविधानाच्या प्रस्तावनेत व मानवी हक्काचा आंतरराष्ट्रीय जाहिरनामा यात व्यक्त झालेला आहे. या निवाड्यामुळे तो प्रत्यक्षात येत आहे ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात सामाजिक, सांप्रदायिक संवेदनशीलता स्थिर ठेवण्यात न्यायालयीन निवाड्यांचे महत्त्वाचे स्थान राहिलेले आहे. समाजाचे ऐहिकरण किंवा धर्मनिरपेक्षीकरण राखणे हे आजघडीला फार गरजेचे व जोखमीचे काम झालेले आहे. हे काम सरकारी पातळीवरून होत नसेल तर न्यायालयीन पातळीवरून होत आहे ही एक अत्यंत स्पृहणीय बाब आहे. भारत हा देश लोकशाहीप्रधान असला तरी सरकारची कार्यकारी सत्ता व कायदेमंडळीय सत्ता एकाधिकारशाहीकडे वाटचाल करतानाच्या काळात जनतेचा अंतिम आशावाद, विश्वास न्यायालयीन सत्तेकडे असतो. म्हणून तर न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकारांतर्गत सर्वोच्च न्यायालय वेळोवेळी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय देऊन संविधानाचे रक्षण आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण सतत करत आलेले आहे. या अनुषंगानेच संविधानातील मूलभूत हक्काचे कलम २१ (जीवन व व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क) यासंदर्भात न्यायालयाने या हक्काची केलेली व्यापक व अर्थपूर्ण व्याख्या व विस्तार याचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात आलेला आहे.

नुकताच २७ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यात कलम २१ ची व्यापकता विस्तारण्यात आलेली आहे. देहविक्री करणे हा गुन्हा नसून त्यांना सन्मानाची वागणूक मिळणे हा त्यांचा घटनादत्त अधिकार आहे असे निवाड्यात म्हटलेले आहे. तेव्हा कलम २१ या कलमाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, कलमाचा स्पष्ट अर्थ, कलमापाठीमागचा संविधानकर्त्याचा उद्देश आणि सर्वोच्च न्यायालयाने या कलमाची रूंदावलेली कक्षा पाहणे गरजेचे आहे. संविधानातील भाग-३ मध्ये कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्काची तरतूद केलेली आहे. यापैकी कलम १९ ते २२ अंतर्गत व्यक्तिस्वातंत्र्याच्या, अधिकाराची नोंद करण्यात आलेली आहे. यापैकी कलम १४, कलम १९ (१) व कलम २१ या तीन हक्कांना मूलभूत हक्कातील सुवर्ण त्रिकोण (Golden Triangle) असे संबोधले जाते. अलीकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाकडून या तीन्ही कलमाचा एकत्रितपणे वापर करून व्यक्तिस्वातंत्र्यासंबंधी खटल्याचा निर्णय दिला जात आहे. पैकी कलम २१ मधील 'व्यक्तीचे जीवन व व्यक्तिस्वातंत्र्य' (Right to life and personal liberty) यास मूलभूत हक्काचे हृदय मानले जाते. (Heart of Fundamental Right) भारतीय संविधानात कलम १९ (१) व कलम २१ यामध्ये व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाराची दोन ठिकाणी नोंद करण्यात आलेली आहे म्हणून प्रथम त्या दोघातील फरक समजून घेता येईल.

कलम १९ (१) मध्ये व्यक्तिस्वातंत्र्यासाठी 'Freedom' हा इंग्रजी शब्द वापरण्यात आलेला आहे. तर कलम २ मध्ये व्यक्तिस्वातंत्र्यासाठी 'Liberty' हा इंग्रजी शब्द वापरण्यात आलेला आहे. तसेच कलम १९ (१) अंतर्गत 'Freedom' सोबत कुठल्या तरी कृतीचा समावेश आहे तर 'Liberty' सोबत अशा कुठल्याही कृतीचा समावेश नाही. कलम १९(१) अंतर्गतचे हक्क भारतीय नागरिक व परकीय नागरिक असा भेद करतात तर कलम २१ अंतर्गत असा कुठलाही भेद करता येत नाही. कलम १९ (१) अंतर्गत व्यक्तीचे अनेक हक्क असतात पैकी काही हक्कच आपल्या घटनेत नोंदविलेले आहेत. उदारणार्थ (सात हक्क) पण कलम २१ अंतर्गत स्वातंत्र्याची अशी कोणतीही यादी दिलेली नाही. कलम १९ अंतर्गत व्यक्तीच्या शारीरिक बंधनाचा, निर्बंधाचा विचार केलेला दिसून येतो. तसेच यामध्ये व्यक्ति व काल्पनिक घटक इत्यादींचा समावेश उदा : संघटना, संघ इ. होतो. तर कलम २१ अंतर्गत व्यक्तीच्या शारीरिक निर्बंधापलीकडे जाऊन इतरही कृती करण्याचे स्वातंत्र्य होय. 'Liberty' या संकल्पनेला मर्यादा आहेत पण 'Freedom' ही संकल्पना पूर्णपणे बंधनविरहितता दर्शविते. 'Liberty' वर बंधने व जबाबदाऱ्या असतात. उदा : सकारात्मक स्वातंत्र्य. 'Liberty' हा 'Freedom' चा एक भाग असला तरी व्यक्ती तुरूंगात असताना 'Freedom' चा वापर करता येत नाही. पण 'Liberty' चा वापर करता येतो. उदा : तुरुंगातील कैद्यांचे अधिकार. वरील स्पष्टीकरण पाहता व्यक्तिस्वातंत्र्यासाठी इंग्रजीतील या दोन शब्द वापरण्यापाठीमागचे घटनाकर्त्यांचे प्रयोजन कळले.

या परिच्छेदात कलम २१ वर अर्थात्मकदृष्ट्या अधिक सखोल चर्चा करूया. भारतीय संविधानातील कलम २१ 'व्यक्तीचे जीवन व व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क' या कलमाचा आंतरराष्ट्रीय संदर्भ म्हणजे हे कलम इ.स.१२१५ च्या इंग्लंडमधील मॅग्नाकार्टा चार्टरशी तसेच अमेरिकेच्या ५ व्या घटनादुरूस्तीच्या कलम ४० (४)-१९३७ व जपानच्या १९४६ च्या कलम ३१ व्या कलमाशी अनुरूप असून अलिकडील आंतरराष्ट्रीय मानवी हक्क जाहिरनामा (१९४८) मधील कलम-३ नुसार 'Every one has the right to life, liberty and personal security' तरतुदीनुसार आहे. कलम २१ नुसार जीवन जगण्याच्या व व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण म्हणजे कोणत्याही व्यक्तीचे जीवन जगण्याचा किंवा व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया शिवाय (Procedure established by law) हिरावून घेता येणार नाही. हा हक्क प्रत्येक व्यक्तिला, नागरिकाला व परकीय व्यक्तीला देण्यात आलेला आहे. या हक्काची घटनेत नोंद करताना आपल्यापुढे अमेरिकन ५ वी व १४ वी घटनादुरूस्ती व त्यातील शब्द याप्रमाणे नोट घेतली गेलेली आहे. अमेरिकन संविधानातील ५ व्या घटनादुरूस्ती (१७९१) प्रमाणे 'व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य व संपत्ती' (Life, Liberty Or Property) अशी तरतूद करण्यात आलेली होती. पैकी भारतीय संविधानकर्त्यांनी 'व्यक्तीचे जीवन व स्वातंत्र्य' (Life & liberty) अशी शब्दयोजना भारतीय घटनेत केली. 'संपत्ती'चा हक्क मात्र या कलमात समाविष्ट करण्यात आलेला नाही. कारण जमीन सुधारणा, लोककल्याण, समाजवाद इ. करण्यासाठी या तरतुदीचा अडथळा होऊ शकतो. म्हणून संपत्तीची तरतूद वगळण्यात आली. तसेच 'स्वातंत्र्या' सोबत 'व्यक्तिस्वातंत्र्य' अशी शब्दयोजना करून तो हक्क मर्यादित करण्यात आला. ही या कलमाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या कलमातील दुसरा भाग म्हणजे 'कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया' (Procedure established by law) याचा ऐतिहासिक संदर्भ पुढील परिच्छेदात पाहू

मेनका गांधी खटल्यापूर्वी न्यायालये निवाड्यासाठी फक्त एकाच सिद्धांताचा वापर करत होते तो म्हणजे 'कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया' (Procedure established by law) जे भारताच्या संविधानात घटनाकर्त्यांनी कलम २१ मध्ये समाविष्ट केलेले आहे. जे तत्त्व भारतीय घटनाकर्त्यांनी जपानच्या संविधानाच्या कलम ३१ नुसार घेतलेले आहे. न्यायालयीन क्षेत्रात दोन सिद्धांत प्रामुख्याने प्रचलित आहेत. (१) कायद्याची उचित प्रक्रिया (Due process of law) (२) **'कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया'** (Procedure established by law) या दोन सिद्धांताचा जन्म इंग्लंडमधील सामान्य कायदा (Common Law) नुसार झालेला आहे. यामध्ये **'कायद्याची उचित प्रक्रिया'** हा सिद्धांत व्यापक व नैसर्गिक न्यायाला प्रमाण मानणारा आहे. अमेरिकन राज्यघटनेत याच सिद्धांताचा वापर करण्यात आलेला आहे. पण भारतीय राज्यघटनेत

'कायद्याची उचित प्रक्रिया' ऐवजी 'कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया' या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आलेला आहे. घटनानिर्मिती प्रक्रियेदरम्यान तत्कालीन घटना सल्लागार बी.एन. राव हे अमेरिकत न्या. फेलीक्स फ्रॅंकफुल्लर यांच्याशी १९४७ ला भेट घेतली तेव्हा त्यांनी राव यांना सल्ला दिला होता की, अमेरिकन 'कायद्याची उचित प्रक्रिया' या तत्त्वाने न्यायालयावर 'Undue burden' आणले जाते. तसेच सरकारांना आपले धोरण ठरविताना या तत्त्वाचा फार त्रास होत होता. उदा : फ्रॅंकलीन डी. रूझवेल्ट यांचा 'न्यू डील धोरण' म्हणून भविष्यातील संघर्ष टाळण्यासाठी राव यांना विनंती करण्यात आली आणि घटना परिषदेत चर्चेअंती शेवटी 'कायद्याची उचित प्रक्रिया' ऐवजी 'कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया' या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला. याचा अर्थ सरकार किंवा कायदेमंडळ यांनी केलेला कायदा किंवा वटहुकूम हे कायद्याद्वारे स्थापित प्रक्रियेनुसार असेल तर तो कायदा अवैध असणार नाही पण तो कायदा व्यक्तीचे मूलभूत हक्क किंवा नैसग्रिक न्यायाचे तत्त्व याचे पालन न करणारा असला तरी चालेल. याच तरतुदीचा आधार घेऊन भारतात १९५० ला **ऐ.के. गोपालन वि. मद्रास राज्य** खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिलेला होता. त्यात त्यांनी कार्यकारी मंडळाच्या निर्णयावर काही बंधने आणली पण कायदेमंडळाच्या कृतीवर मात्र बंधनाचा उल्लेख त्यात नव्हता. तेव्हा शासनाचा हेतू काहीही असेल तरी चालेल पण कायदा किंवा धोरणाची प्रक्रिया मात्र कायद्यानुसार वैध असली पाहिजे हेच तत्त्व प्रचलित होते. १९७८ ला **मेनका गांधी वि. केंद्र सरकार** या खटल्यात न्यायालयाने ए.के. गोपालन खटल्याचा निर्णय फिरवला व एक ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय दिला. ज्यात वरील दोन्ही सिद्धांताचा वापर करण्यात आला व कलम २१ चे व्यापक विश्लेषण केले. यात प्रामुख्याने तीन प्रमुख मुद्यांची नव्याने भर घातली.

१) व्यक्तिगत स्वातंत्र्य सरकारला हिरावून घेता येते किंवा निर्बंध लादता येतात पण ते कायद्याद्वारे स्थापित प्रक्रियेनेच घेता येते. तसेच ही प्रक्रिया न्याय, उचित व योग्य, वाजवी असली पाहिजे. ( Just, fair and resonable) म्हणजेच कायद्याची उचित प्रक्रिया अवलंबवावी.

२) मानवी जीवन हे केवळ सजीव अस्तित्व नसून त्यास मानवी प्रतिष्ठेसह (Dignified human existence) म्हणजेच अर्थपूर्ण जीवन जगता आले पाहिजे.

३) केवळ कार्यकारी मंडळ नसून कायदे मंडळाच्या मनमानीविरुद्ध ही हे कलम वापरता येते.

म्हणजेच या सिद्धांतात सुप्रीम कोर्टाने Due process o Procedure established by law या दोन्ही सिद्धांताचा वापर केलेला दिसून येतो. मेनका गांधी खटल्यापूर्वी कलम २१ ची व्यापकता फारच मर्यादित होती. पण त्यानंतर मात्र कलम २१ ची व्यापकता मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येत आहे.

न्यायालयाने आतापर्यंत कलम २१ अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वातील बरीच तत्त्वे लागू केलेली आहेत. ज्यामध्ये व्यक्तीचा सर्वांगीण विकास यांचा समावेश आहे. या हक्कात न्यायालयाने आतापर्यंत पुढील हक्कांचा समावेश केलेला आहे.

**सुनिल बात्रा वि. दिल्ली प्रशासन** खटल्यात प्रतिष्ठेसह जगण्याचा मानवी हक्क, कामाच्या ठिकाणी लैंगिक अपमानास प्रतिबंध, उदरनिर्वाह करण्याचा, स्वच्छ पर्यावरण, शिक्षण, गोपनीयता, सहजीवन जगणे, सकारात्मक इच्छारण (Passive ethunsia) इ. हक्कांचा समावेश या कलमात होतो.

कलम २१ ची वरील दोन परिच्छेदातील चर्चा पाहिल्यानंतर अंतिम निष्कर्ष आपणास काढता येईल की, संबंधित हक्क हा व्यक्तीच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा हक्क आहे. जो जगातील लोकशाही प्रधान देशात अंमलबजावणीत आणला जातो. या हक्काने व्यक्तीला शाश्वत आत्मविश्वास मिळालेला दिसून येतो. कारण हा हक्क आणीबाणीतही रद्द करता येत नाही तसेच सर्व नागरिकांनाही उपलब्ध आहे कारण मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून भेदाभेद करता येत नाही. या हक्कांबद्दल आतापर्यंत न्यायालयाने सरकारच्या विरोधात जाऊन उदारमतवादी दृष्टिकोनातून या हक्काच्या कक्षा रूंदावलेल्या आहेत. म्हणजेच बहुस्तरीय अर्थ प्राप्त करून दिलेला आहे. तसेच या हक्काचा सर्वात मोठा अर्थ म्हणून नैसर्गिक न्यायाचे तत्त्व यातून पूर्णपणे प्रतीत होते. तसेच न्यायालयाने आतापर्यंत घेतलेली भूमिका ही न्यायालयीन सक्रियतेला आणखीन संवेदनशील केलेली दिसून येते. या हक्काला व त्यासंदर्भातील व्यापकतेला सर्वात जबाबदार कोण असेल तर जनहित याचिका (PIL) सुमोटो व न्यायालयाचा सकारात्मक दृष्टिकोन. या हक्काला दिवसेंदिवस नवीन आयाम प्राप्त होत आहेत. लोकशाही अधिक जनताभिमुख (Public Oriented) होत आहे. व्यक्तीला त्याचा व्यक्तिगत अवकाश व गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याची संधी या हक्काने प्राप्त होत आहे. खरे तर आपले मूलभूत हक्काचे स्वरूप हे व्यक्तिगत नसून समुहाला दिलेले आहेत. पण या हक्काने हक्काला व्यक्तिगत स्वरूप प्राप्त झालेले आहे. संविधानाचा Doctrine of Constitutioanl Silence या तत्त्वाचा पुरेपूर वापर या हक्काच्या संदर्भात न्यायालय करताना दिसत आहे ही अत्यंत प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे. पण इथे एक वैधतेचा प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे शासनाच्या तीनही शाखा उचित समतोल/समन्वय असणे अपेक्षित आहे. न्यायालय यानिमित्ताने आपल्या मर्यादा ओलांडून कार्यकारी कायदेमंडळीय कक्षेत हस्तक्षेप करत असेल तर तोही सत्तेच्या विभाजनाच्या सिद्धांताला मारक होऊ शकतो. म्हणून शेवटी सर्व शाखांनी आपापल्या संविधानिक मर्यादेच्या कक्षेत राहून व्यक्तीचे महत्तम हित साधले जाणे ही अपेक्षा या चर्चेतून व्यक्त होऊ शकते.

**संदर्भ**

- Dr.J.N. Pandey (1969), 'Constitutional Law of India', Central Law Agency, Allahabad
– दुर्गादास बसू (2015), 'भारतीय राज्यघटनेची ओळख', लेक्सिस नेक्सीस, नवी दिल्ली
- Subhas, G. Kashyap (2008), 'Out Political System', National Book Trust of India, New Delhi.
- Gajre Balasaheb Songirao (2013), 'A Critical Analysis of Right to Life and Personal Liberty Under Article 21 of Indian Constitution', http://hdl.handle.net/shodhganga
- Dr.Anant Kalse (2016), 'Human Rights in Constitution of India', Lecture in Commonwealth Parliamentary Association
- Raj Jain (2021), 'Article 21 : Understanding the Right of Life and Personal Liberty' Case Laws : Academic Explainer UKS Punjab University
- India Legal Services, 'Article 21 of the Constitution of India', The Expanding Horizans. www.leglservice.india.com/articles,
- Noorani A.G. (2021), 'Constitutional Questions in India', Oxford University Press
- Rohan J. Alva (2020), 'Liberty After Freedom', HarperCollins India